तरुण भारत संवाद

गुरूवार २३ मे २०२४

# बारावी परीक्षेत विविध शिक्षण संस्थांचे यश

प्रतिनिधी
कोल्हापूर

बारावी परीक्षेचा मंगळवारी ऑनलाईन निकाल जाहीर झाला. या निकालात विविध शिक्षण संस्थांच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थांच्या वतीने करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पेढे वाटून आपल्या कुटुंबियांसोबत यशाचा आनंद साजरा केला. विवेकानंद संस्थेच्या वतीने गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.

**विवेकानंद कॉलेज**

विवेकानंद कॉलेजच्या विज्ञान शाखेत मुश्ताक उस्ताद ९५ गुण मिळवत प्रथम, ओम मानेने ९४.८३ गुण मिळवत व्दितीय तर अर्चनाकुमारी दरोगा हिने ९२.३३ गुण मिळत तृतीय क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेत खुशी शेवरमनीने ९५.३३ गुण मिळवत प्रथम, शुभम पाटीलने ९३.८३ गुण मिळवत व्दितीय आणि वैभव गोंधळीने ९३ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेत विवेक लवटेने ९०.८३ गुण मिळवत प्रथम , श्रावणी पाटील ८८.६७ गुण मिळवत व्दितीय तर नाझिया नदाफ ८७.६७ गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेचा निकाल ८६.३४, वाणिज्य शाखेचा ९८.५३ तर विज्ञान शाखेचा निकाल ९९.८८ टक्के लागला आहे. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे व प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते गुणवंतांचा सत्कार केला. संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे व



**कोल्हापूर : बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांबरोबर विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आदी.**

**▪ संस्थांकडून गुणवंतांचे अभिनंदन व सत्कार**

मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. यु. आर. हिरकुडे, प्रा. विश्वंभर कुलकर्णी आदी उपस्थित होते.


**प्रायव्हेट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज**

प्रायव्हेट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला आहे. सायन्स व वाणिज्य (इंग्रजी माध्यम) विद्यार्थ्यांनी भरघोस यश मिळवले आहे. संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. संस्थेचे चेअरमन, व्हा.चेअरमन, सेक्रेटरी, कार्यवाह, कॉलेजचे प्राचार्य, विभागप्रमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विद्यार्थ्यांना सहकार्य लाभले.

सकाळ

कोल्हापूर, गुरुवार, २३ मे २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात १२ वी परिक्षेतील यशस्वी विद्यार्थी, विद्यार्थिनींसह उपस्थित मान्यवर.

कला, वाणिज्य, विज्ञान शाखेत अव्वलस्थानी विवेकानंद कॉलेज राहिले. याचा सार्थ अभिमान आहे, असे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी सांगितले. कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले.

विज्ञान शाखेत अनुक्रमे अल्तमाश उस्ताद (९५), ओम माने (९४.८३), अर्चनाकुमारी दरोगा (९२.३३) हिने गुण मिळवले. वाणिज्य शाखेत अनुक्रमे खुशी शेवरमनी (९५.३३), शुभम पाटील (९३.८३), वैभवी गोंधळी (९३) टक्के गुण मिळवले. कला शाखेत अनुक्रमे विवेक लवटे (९०.८३), श्रावणी पाटील (८८.६७), नाझिया नदाफ (८७.६७) गुण संपादन केले. कला शाखेचा निकाल ८६.३४, वाणिज्य शाखेचा ९८.५३ तर विज्ञान शाखेचा निकाल ९९.८८ टक्के निकाल लागला. सरासरी निकाल ९७.६३ टक्के लागला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले, 'विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. अनुभवी प्राध्यापक आणि सातत्याचे मार्गदर्शन अभ्यास पद्धतीमुळेच गुणवत्ता यादीत विद्यार्थी आले.'

प्रा. एम. ए. कुरणे यांनी प्रास्ताविक केले. प्रा यु. आर. हिरकुडे यांनी आभार मानले. प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी कोल्हापूर, गुरुवार, २३ मे २०२४

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून तिसरे राज्यस्तरीय अक्षर संमेलन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'माझी शाळा माझा फळा' समूह आणि शिवाजी विद्यापीठाचा संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ ते २६ मे या कालावधीत महाराष्ट्रातील कलाकारांचे तिसरे राज्यस्तरीय अक्षर संमेलन आयोजित केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाचे सहसचिव व्यंकटेश भट संमेलनाध्यक्ष आहेत.

शुक्रवारी सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन होईल. यावेळी ज्येष्ठ चित्रकार संजय शेलार, शुभम गायकवाड, नरेंद्र महाडिक व ज्येष्ठ अक्षरमित्र सहभागी होतील. यानंतर 'कलेतून व्यवसायनिर्मिती' या विषयावर परिसंवाद होईल. गालिचा व अक्षर रांगोळी उपक्रम होईल. रात्री संगीत मैफल होईल. यामध्ये 'मी होणार सुपरस्टार जल्लोष ज्युनिअर्सचा फेम' कु. श्रीमयी सूर्यवंशी सादरीकरण करतील.

शनिवारी फलक लेखन व व्यक्तिचित्र रेखाटन प्रात्यक्षिक होईल. रात्री ९ वाजता संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे सांस्कृतिक कार्यक्रम होईल. रविवारी (दि. २६) विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर हॅप्पी आर्ट मॉर्निंगमध्ये वैयक्तिक कलेचे सादरीकरण होईल. अक्षर सन्मान सोहळ्याने संमेलनाची सांगता होईल.

यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान होणार आहे. यावेळी गृह विभागाचे सहसचिव व्यंकटेश भट, सहसचिव (मुख्यमंत्री कार्यालय) कैलास बिलोणीकर, सहसचिव (महसूल व वन विभाग) संजय इंगळे, जिल्हाधिकारी अमोल येडगे व विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार उपस्थित राहणार आहेत. रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अक्षरमित्र संयोजक अमित भोरकडे, सतीश उपळावीकर व संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले आहे.